नागपूर
# महासागर वृत्तसागर
■ गुरुवार, दि. १५ जानेवारी २०२६ ■

## अवैध दारूचा मोठा साठा जप्त

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :

निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गुन्हे शाखेच्या सोनसाखळी चोरी विरोधी पथक व वाठोडा पोलिसांनी वेगवेगळी कारवाई करीत अवैध दारू विक्रेत्यांवर कारवाई करीत मोठ्याप्रमाणात अवैध दारूसाठा जप्त केला. दोन्ही कारवाईत ३ आरोपींना अटक केली, तर एक आरोपी फरार आहे.

मध्यरात्रीच्या सुमारास गुन्हे शाखेचे सोनसाखळी चोरी विरोधी पथक जरीपटका ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान इंदिरानगर, गल्ली क्र. १० येथे राहणारा आरोपी विकास बाबुलाल डहाट (४३) याने त्याच्या घरी मोठ्याप्रमाणात अवैध दारूचा साठा करून ठेवला असल्याची माहिती पथकाला मिळाली. या माहितीच्या आधारावर पोलिसांनी पंचासह त्याच्या घरावर धाड टाकली. झडतीदरम्यान ४ पोत्यांमध्ये देशी दारूच्या ९० एमएलच्या ११९० बॉटल आणि विदेशी दारूच्या १८० एमएलच्या ६९ बॉटल मिळून आल्या. पोलिसांनी देशी-विदेशी दारू व दुचाकी वाहन जप्त करून विकासला अटक केली. मालाबाबत विचारपूस केली असता परिसरातच्या राहणाऱ्या अनिल खरेच्या मदतीने माल आणल्याची माहिती दिली. पोलिसांनी अनिल खरेविरुद्धही गुन्हा नोंदविला, मात्र तो पोलिसांच्या हाती लागला नाही. विकासला पुढील कार्यवाहीसाठी मुद्देमालासह जरीपटका पोलिसांच्या स्वाधिन केले आहे. फरार आरोपीचा शोध सुरू आहे. दुसरी कारवाई वाठोडा पोलिसांनी केली. मंगळवारी दुपारी पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान दोन इसम दुचाकीने अवैधरित्या दारूची वाहतूक करीत असल्याची माहिती मिळाली.

## पोलीस विभाग अलर्ट मोडवर : प्रशासन सज्ज

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

महानगरपालिका निवडणुकीसाठीचे मतदान गुरूवारी असले तरी शहर पोलिसांनी महिनाभर आधीच तयारी सुरू केली होती. आचारसंहिता लागू झाल्यापासून पोलिसांनी गुन्हेगार आणि बेकायदेशीर दारू विक्रेत्यांवर कारवाई सुरू केली आहे. शांततेत निवडणूक पार पडावी यासाठी वातावरण बिघडवणाऱ्या असामाजिक घटकांवर कारवाई केली जात आहे. निवडणूक ड्यूटीसाठी पोलिस सज्ज आहेत. आतापर्यंत २३४ बेकायदेशीर दारू विक्रेत्यांवर कारवाई करण्यात आली आहे. येत्या तीन दिवसांत ही कारवाई आणखी तीव्र होईल. याशिवाय, पोलिसांनी एमपीडीए अंतर्गत दोन गुन्हेगारांवर कारवाई केली आहे, एकास हद्दपार केले आहे आणि ८१८ जणांवर विविध कलमांखाली कारवाई केली आहे. शहरातील २,०५२ जणांकडे परवानाधारक शस्त्रे आहेत, त्यापैकी १,५८४ जणांना सूट देण्यात आली आहे. ३१३ शस्त्रे जमा करून घेतले आहेत.



### ५४६८ पोलिसांची तैनाती

शहरातील मतदान केंद्रे आणि स्ट्राँग रूममध्ये एकूण ५,४६८ पोलिस कर्मचारी तैनात केले जातील. याशिवाय, राज्य राखीव पोलिस दल (एसआरपीएफ)च्या २ तुकड्या आणि एक प्लाटूनचीही मदत घेतली जाईल. बंदोबस्तात शहर पोलिस विभागातील ४८९ अधिकारी, २,९६७ पुरुष कर्मचारी आणि १,०८० महिला कर्मचारी तैनात केले आहेत. अशाप्रकारे शहरात एकूण ४,०४७ पोलिस कर्मचारी तैनात असतील. याव्यतिरिक्त, मतदान केंद्रे, मतमोजणी केंद्रे आणि संवेदनशील भागाची सुरक्षा अधिक मजबूत करण्यासाठी आसपासच्या जिल्ह्यांमधून आणि विशेष युनिट्समधून अतिरिक्त पोलिस बळ मागवण्यात आले आहे.

### इतर जिल्ह्यांतूनही बोलावले कर्मचारी

नागपूर ग्रामीण, वर्धा, अमरावती ग्रामीण आणि बुलढाणा जिल्ह्यातून पोलिस बळ मागवण्यात आले आहे. नागपूर ग्रामीणमधून ३५०, वर्धा जिल्ह्यातील १००, अमरावती ग्रामीणमधून १६० आणि बुलढाण्यामधून २६० कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. महामार्ग सुरक्षा पोलिसांचे ३० जवान, रॅपिड पोलिस टीम स्क्वॉड महिला युनिटमधील ५२१ कर्मचारी आणि महाराष्ट्र पोलिस अकॅडमी, नाशिकमधील ३२ अधिकाऱ्यांवर देखरेखीची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

पोलिस आयुक्त सिंगल यांनी सांगितले की, संवेदनशील आणि अतिसंवेदनशील मतदान केंद्रांवर विशेष लक्ष दिले जात आहे. स्ट्राँग रूम, मतदान केंद्रे, मतमोजणी केंद्रे आणि प्रमुख वाहतूक चौकांत अतिरिक्त पोलिस बळ तैनात असेल. मतदान प्रक्रियेदरम्यान शिघ्रकृती दल (क्यूआरटी), ३ दंगल नियंत्रण पथके (आरसीपी) आणि गस्ती पथके सतर्क राहतील. त्यांनी सांगितले की, मतदारांना त्यांचा लोकशाही अधिकार निर्भयपणे वापरता यावा, याला प्राधान्य असेल. प्रत्येक मतदान केंद्रावर पुरेसे पोलिस बळ तैनात करण्यात आले आहे आणि कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून कडक बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

### आदर्श आचारसंहितेचे पालन करा

पोलिस आयुक्त म्हणाले की, सर्व उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांनी आदर्श आचारसंहितेचे पालन करावे लागेल. कोणीही याचे उल्लंघन केले, तर कायदेशीर कारवाई केली जाईल. कायदा आणि सुव्यवस्था बिघडवण्याचा किंवा मतदारांना प्रभावित करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल. साध्या वेशातील पोलिस मंगळवारी संध्याकाळपासूनच विविध भागात गस्त घालत आहेत. मतमोजणी पूर्ण होईपर्यंत निषेधाज्ञा लागू असेल आणि व्यापक गस्त घातली जाईल.

## आचारसंहितेचा भंग
### चंद्रशेखर बावनकुळे वादाच्या भोवऱ्यात

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :



नागपूर महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराची मुदत संपलेली असतानाच, प्रभाग क्रमांक 10 मध्ये पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे भाजप उमेदवारासह फिरत असल्याचा आरोप काँग्रेसने केल्यामुळे बुधवारी स्थानिक राजकारण चांगलेच तापले. या आरोपावरून गिट्टीखदान पोलीस ठाण्याच्या हद्दीत काँग्रेस आणि भाजप कार्यकर्त्यांमध्ये जोरदार शाब्दिक चकमक उडाली, ज्यामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, पोलिसांनी वेळीच मध्यस्थी आणि तत्पर हस्तक्षेप केल्यामुळे पुढील अनर्थ टळला आणि परिस्थिती नियंत्रणात आली.

निवडणुकीच्या प्रचाराची मुदत संपलेली असतानाही, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे प्रभाग क्रमांक 10 मध्ये भाजप उमेदवारासोबत फिरत असल्याचा गंभीर आरोप काँग्रेस उमेदवारांनी केला आहे. पालकमंत्री म्हणून त्यांना फिरण्याचे स्वातंत्र्य असले तरी, प्रचारबंदी लागू झाल्यानंतर एखाद्या उमेदवारासोबत प्रत्यक्ष फिरणे हे निवडणूक आचारसंहितेचे स्पष्ट उल्लंघन आहे, असा दावा काँग्रेसने केला. या मुद्द्यावरून राजकीय वतुर्ळात चांगलीच खळबळ उडाली असून पालकमंत्र्यांच्या या कृतीवर काँग्रेसने तीव्र आक्षेप नोंदवला आहे.

या घटनेमुळे कुतुबशहा नगर परिसरात प्रचंड तणाव निर्माण झाला असून काँग्रेस शहराध्यक्ष विकास ठाकरे यांनीही तातडीने घटनास्थळी धाव घेतली. यावेळी काँग्रेस आणि भाजप कार्यकर्ते आमनेसामने आल्याने त्यांच्यात जोरदार शाब्दिक चकमक झाली आणि परिस्थिती हाताबाहेर जाण्याची शक्यता निर्माण झाली होती. मात्र, गिट्टीखदान पोलिसांनी वेळीच प्रसंगावधान राखत घटनास्थळी धाव घेतली आणि दोन्ही गटांना शांत केले, ज्यामुळे पुढील अनर्थ टळला.

या आरोपांवर चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्टीकरण दिले. कुतुबशहा नगरमधील राजू देवगडे हे माझे अत्यंत जवळचे कार्यकर्ते आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी मला त्यांच्या घरी बोलावले होते. त्या निमित्ताने मी काही कार्यकर्त्यांच्या घरी भेटीगाठी घेत होतो, असे बावनकुळे यांनी सांगितले. तसेच काँग्रेसच्या काही कार्यकर्त्यांमध्ये गैरसमज झाला की मी निवडणूक प्रचारासाठी आलो आहे. मात्र हा पूर्णपणे गैरसमज होता. काँग्रेसचे शहराध्यक्ष विकास ठाकरे घटनास्थळी आले होते. त्यांना सर्व वस्तुस्थिती समजावून सांगितली असून सत्य त्यांच्या लक्षात आले आहे. त्यामुळे काँग्रेसचा गैरसमज आता दूर झाला असेल, असे मला वाटते, असे बावनकुळे म्हणाले.

पुढे बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, निवडणूक आयोगाच्या नियमानुसार प्रचार न करता, कोणतेही पत्रक न वाटता कार्यकर्त्यांच्या घरी भेट देण्यास परवानगी आहे.

## मांजाने कापले नाक
## दुचाकीस्वार कोसळला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

शहर पोलिसांनी वारंवार तंबी दिल्यानंतरही उपराजधानीत संक्रांतीच्या दिवशी पतंगबाजीचा धुडगूस सुरूच राहिला. काचेचा व नायलॉनचा वापर केलेल्या पतंगीच्या मांजामुळे शहरात विविध ठिकाणी अपघात घडले असून महिला, दुचाकीस्वार तसेच लहान मुलांसह सहा जण जखमी झाले. या सर्वांना शासकीय मेडिकल आणि मेयो रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. शहरातील पतंगीमुळे एकूण जखमींबाबत आपण जाणून घेऊ या.

नागपुरातील अमरावती रोड परिसरात पतंगीच्या मांजाने एका महिलेच्या नाकाला गंभीर इजा झाली. अचानक समोरून आलेला मांजा नाकाला लागल्याने महिलेला रक्तस्राव झाला. दुसऱ्या घटनेत मांजा अंगावर आल्याने एक दुचाकीस्वार नियंत्रण सुटून खाली पडला. त्याच्यावर मागून येणारा दुसरा व्यक्ती कोसळल्याने दोघेही जखमी झाले. या घटनेमुळे काही काळ वाहतुकीलाही अडथळा निर्माण झाला. मेयो रुग्णालयात दाखल झालेल्या जखमींमध्ये एका ११ वर्षीय मुलीचा आणि १२ वर्षीय



मुलाचा समावेश आहे. मुलीच्या उजव्या हाताच्या बोटाला मांजामुळे खोल चिरा पडला असून १२ वर्षीय मुलाच्या डोळ्याजवळ गंभीर इजा झाली आहे. याशिवाय ५५ वर्षीय महिलेलाही मांजाचा चिरा लागल्याने उपचारासाठी दाखल करण्यात आले. तिघांनाही शल्यक्रिया विभागात उपचार देण्यात आले. तिघांपैकी दोन रुग्णांना टाके लावून रक्तस्राव थांबवण्यात आला असून काही तासांनी त्यांना घरी सोडण्यात आले.

मेडिकल रुग्णालयात रामेश्वरी परिसरातील २७ वर्षीय तरुण पायातील करंगडीला खोल जखम होऊन दाखल झाला. पतंग उडवत असताना मांजा पायात अडकून तो जखमी झाला होता. तसेच जयप्रकाश नगर येथील एका दुचाकीस्वाराच्या डाव्या पायावर मांजा लागून इजा झाली. रात्री आणखी एक जखमी मेडिकलमध्ये दाखल झाला. तिघांनाही शल्यक्रिया विभागात उपचार देऊन काही तास-ांनी सुट्टी देण्यात आली. दरम्यान, शहरातील काही खासगी रुग्णालयातही अशाच स्वरूपाच्या जखमींची नोंद झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. मात्र आरोग्य विभागाकडे या प्रकारच्या अपघातांची स्वतंत्र नोंद नसल्याने संक्रांतीच्या दिवशी मांजामुळे झालेल्या जखमांची वास्तविक संख्या समोर येऊ शकली नाही.

नागपूर पोलिसांनी मागील काही दिवसांपासून सातत्याने नायलॉन मांजा विक्री करणाऱ्यांवर कारवाई केली आहे. त्यानंतरही शहरात मोठ्या प्रमाणावर काही नागरिकांकडून नायलॉन मांजाचा पतंग उडवतांना वापर झाल्याचा नागरिकांचा आरोप आहे. यातूनच शहरात बरेच जण मांजामुळे जखमी झाले. दरम्यान शहरात संक्रांतीनंतरही पुढे काही दिवस पतंग उडवली जाते. त्यामुळे पुढच्या काळात मांजाचे जखमी कमी करण्यासाठी पोलीस काय करणार? याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

## सलग तीन दिवस मद्यविक्री बंद

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचा थरार अंतिम टप्प्यात पोहोचला असतानाच तळीरामांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. निवडणूक प्रक्रिया शांततेत आणि सुरळीत पार पडावी, यासाठी आजपासून सलग तीन दिवस संबंधित महापालिका क्षेत्रांत ड्राय डे जाहीर करण्यात आला आहे. त्यामुळे आजपासून अनेक ठिकाणच्या वाइन शॉप्स, बार आणि परमिट रूम्स बंद राहणार आहेत. राज्यात गुरुवारी (१५ जानेवारी) होणारे मतदान आणि त्यानंतर शुक्रवारी (१६ जानेवारी) होणारी मतमोजणी लक्षात घेता, कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाने महसूल विभागाच्या मार्गदर्शनाखाली हा आदेश जारी केला आहे. गुरुवार हा मतदानाचा दिवस असल्याने त्या दिवशीही वाइन शॉप्स, बार, परमिट रूम्स आणि बिअर शॉपी पूर्णपणे बंद असतील.

## नागपुरात शासकीय दंत महाविद्यालयातील ७२ निवासी डॉक्टरांचे कामबंद आंदोलन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालयातील निवासी डॉक्टरांचा संयम अखेर सोमवारी (दि.१२) संपला. गेल्या तीन महिन्यांपासून वेतन न मिळाल्याने संतप्त झालेल्या ७२ पदव्युत्तर निवासी डॉक्टरांनी कामबंद आंदोलन पुकारले. या आंदोलनाचा थेट फटका ओपीडी आणि आयपीडी सेवांना बसला असून, शेकडो रुग्णांना उपचाराविना परतावे लागले.

दंत महाविद्यालयात कार्यरत असलेल्या ७२ पदव्युत्तर निवासी डॉक्टरांना दरमहा सुमारे ७० हजार रुपये वेतन मिळते. याच रकमेतून मेस शुल्क, पुस्तके, स्टेशनरी तसेच दैनंदिन खर्च भागवावा लागतो. मात्र, ऑक्टोबर महिन्यापासून एकही वेतन न मिळाल्याने डॉक्टर आर्थिक अडचणीत सापडले आहेत. याबाबत प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करूनही केवळ आश्वासनांशिवाय काहीच मिळाले नसल्याचा आरोप डॉक्टरांनी केला.

सोमवार असल्याने रुग्णालयात मोठी गर्दी होती. दंत रुग्णालयातील बहुतांश उपचार निवासी डॉक्टरांवर अवलंबून असल्याने कामबंद आंदोलनामुळे उपचार सेवा जवळपास ठप्प झाल्या. अनेक रुग्णांना उद्या या असे सांगून परत पाठवण्यात आले, तर काही रुग्ण दुपारपर्यंत नंबरची वाट पाहत बसून राहिले. दंत उपचार ही दीर्घकालीन प्रक्रिया असल्याने दूरवरून आलेले रुग्ण विशेषतः निराश झाले.

वेतन न मिळाल्याने काही निवासी डॉक्टर कुटुंबीयांच्या आर्थिक मदतीवर अवलंबून आहेत, तर काहींना दैनंदिन खर्चासाठी कर्ज काढावे लागल्याची माहिती समोर आली आहे. सोमवारी सकाळी ५० हून अधिक निवासी डॉक्टरांनी डीन कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. दरम्यान, सोमवारी सायंकाळपर्यंत हा प्रश्न सोडविण्याचे आश्वासन प्रशासनाकडून देण्यात आले. वेतन वितरणाबाबत वैद्यकीय शिक्षण विभागाकडे नियमित पाठपुरावा सुरू असून, महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर वेतन देण्यास विलंब झाल्याचे कारण प्रशासनाकडून सांगण्यात आले.

## बँक कर्मचारी बनला वाहन चोर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :

एका नामांकित बँकेत कर्मचारी म्हणून कार्यरत असताना मौजमज्जा करण्यासाठी पैसे उडविण्याची सवय जडली. शौक पूर्ण करण्यासाठी त्याने बँकेत पैशांचा गैरव्यवहार केला. त्याचा भंडाफोड झाल्यानंतर त्याची नोकरी गेली. त्यामुळे त्याने थेट दुचाकी चोरीचा मार्ग पत्करला. नागपूर शहरासह अमरावतीच्या ग्रामीण भागात त्याने धुमाकूळ घातला होता. तब्बल ६३ दुचाकी चोरी केल्यानंतर तो गुन्हे शाखेच्या जाळ्यात अडकला. मध्यप्रदेशातील सातनेर येथून पोलिसांनी त्याला अटक केली. चौकशीत त्याच्याकडून एक-दोन नव्हे तर तब्बल २३ गुन्हे उघडकीस आले. पोलिसांनी त्याच्याकडून २७ वाहनांसह १६ लाख ५० हजारांचा मुद्देमाला जप्त केला. राहुल सुखचंद खाकरे ऊर्फ ठाकरे (४३) रा. पाच झोपडा, मिनीमातानगर, कळमना असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, राहुल हा मुळचा मध्यप्रदेशातील सातनेर या गावचा रहिवाशी आहे. ५ वर्षांपूर्वी तो एका खासगी बँकेत एजंट म्हणून काम करायचा. या दरम्यान त्याला मौजमज्जा करण्यासाठी पैसे उडविण्याची सवय जडली. शौक पूर्ण करण्यासाठी त्याने पैशांचा अपहार केला आणि त्याला नोकरीतून काढण्यात आले. नागपुरात येऊन त्याने राहण्यासाठी मिनी मातानगरच्या पाच झोपडा परिसरात भाड्याने खोली घेतली.

काही दिवस त्याने भाजीपाल्याचा धंदा केला. परंतु, या धंद्यात त्याचे मन रमले नाही आणि तो थेट वाहन चोरीकडे वळला. आठवडी बाजारातून तो वाहन चोरी करीत होता. एमआयडीसीच्या वानाडोंगरी परिसरात राहणारे फियार्दी श्रीकांत वाळके हे गत ३ जानेवारीच्या रात्री ८ वाजताच्या सुमारास आयसी चौकाजवळ भरणाऱ्या बाजारात गेले होते. त्यांनी त्यांची एमएच-४०/एजी-७६०९ क्रमांकाची मोटारसायकल रस्त्यालगत पार्क केली आणि भाजी घेण्यासाठी गेले. या दरम्यान अज्ञात आरोपीने त्यांची दुचाकी चोरून नेली.

## महावितरण भरारी पथकाचा 'विद्युत स्ट्राईक'
### ९ महिन्यांत ३५ कोटींची अनियमितता उघड, वीज चोरांचे धाबे दणाणले!

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

महावितरणच्या 'सुरक्षा व अंमलबजावणी' विभागा अंतर्गत कार्यरत भरारी पथकांनी नागपूर प्रादेशिक विभागात (विदर्भात) वीजचोरी विरोधातील मोहिमेचा धडाका लावला आहे. एप्रिल ते डिसेंबर 2025 या अवघ्या नऊ महिन्यांच्या कालावधीत विभागाने सुमारे 35.95 कोटी रुपयांची वीजचोरी व अनियमितता उघडकीस आणली असून, 308 ग्राहकांवर फौजदारी गुन्हे केले आहेत.



कारवाईचा सविस्तर आढावाः 2,214 ठिकाणी थेट चोरीः भरारी पथकांनी या नऊ महिन्यांत विदर्भातील एकूण 7,771 ग्राहकांच्या वीज जोडण्यांची कसून तपासणी केली. यामध्ये घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक अशा सर्व प्रकारच्या ग्राहकांचा समावेश होता. या तपासणी मोहिमेत धक्कादायक वास्तव समोर आले असून, तब्बल 2,214 ग्राहकांकडे थेट वीजचोरी होत असल्याचे निष्पन्न झाले. या चोरांविरुद्ध 'विद्युत कायदा 2003' मधील सुधारित 'कलम 135' अन्वये कडक कारवाई करण्यात आली आहे. या एकाच कलमांतर्गत 25.43 कोटी रुपयांच्या वीजचोरीची प्रकरणे उघडकीस आली आहेत.

कलम 126 अंतर्गत अनियमिततेवरही टाचः थेट वीजचोरीव्यतिरिक्त, विजेचा अनधिकृत वापर किंवा मंजूर भारापेक्षा अधिक वापर करणाऱ्या ग्राहकांवरही महावितरणने लक्ष केंद्रित केले आहे. विद्युत कायदा 2003 च्या कलम 126 अन्वये एकूण 890 प्रकरणांमध्ये 10.52 कोटी रुपयांची अनियमितता उघड झाली आहे. वीजचोरी आणि अनियमितता अशा दोन्ही कारवाया मिळून एकूण 35.95 कोटी रुपयांच्या दंडाचे निर्धारण करण्यात आले. त्यापैकी 31.03 कोटी रुपयांची विक्रमी वसुली महावितरणने संबंधित ग्राहकांकडून केली आहे.

308 ग्राहकांवर पोलीस कारवाई; तुरुंगवासाची टांगती तलवारः ज्या ग्राहकांनी चोरीची रक्कम आणि दंडाचा भरणा करण्यास टाळाटाळ केली, त्यांच्या विरोधात महावितरणने आता पोलीस बडगा उगारला आहे. नागपूर परिक्षेत्रातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये एकूण 308 वीज ग्राहकांविरुद्ध वीजचोरीचे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या कारवाईमुळे वीज चोरी हा केवळ दंडनीय अपराध नसून, तो फौजदारी गुन्हा आहे, असा स्पष्ट संदेश महावितरणने दिला आहे.

भरारी पथकांचे जाळे आणि अत्याधुनिक यंत्रणाः महावितरणचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी कंपनीचा सुरक्षा व अंमलबजावणी विभाग अविरतपणे कार्यरत आहे. ही संपूर्ण यंत्रणा कार्यकारी संचालक (सुरक्षा व अंमलबजावणी), मुंबई यांच्या अधिपत्याखाली काम करत आहे. नागपूर प्रादेशिक विभागात या कामाचे सूक्ष्म नियोजन करण्यात आले असून त्यात मंडळ स्तरावर 12 विशेष भरारी पथके, विभागीय स्तरावर 3 मुख्य भरारी पथके आणि नागपूर आणि अकोला परिमंडलात स्वतंत्र सुरक्षा व अंमलबजावणी कार्यालये कार्यरत आहेत. या पथकांकडे अत्याधुनिक साधने असून, संशयास्पद वीज वापर असलेल्या ठिकाणांची माहिती मिळताच ही पथके तातडीने छापे टाकतात.

नागरिकांसाठी सुवर्णसंधीः माहिती द्या आणि बक्षीस मिळवा !ः वीजचोरी हा एक सामाजिक अपराध आहे. यामुळे वीज वितरण हानी वाढते आणि पर्यायाने सर्वसामान्य ग्राहकांवर त्याचा बोजा पडतो. हे रोखण्यासाठी महावितरणने जनतेला सहकार्याचे आवाहन केले आहे. आपल्या परिसरात वीज चोरी होत असल्याची माहिती स्थानिक भरारी पथक किंवा जवळच्या महावितरण कार्यालयास द्यावी.

## मतदानाच्या दिवशी दिव्यांग मतदारांकारिता विशेष सोय
### व्हॉट्सॲप वर लोकेशन शेअर करताच होईल बूथ पर्यंत ये-जा करण्याची सोय

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १४ :



नागपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीसाठी गुरूवार १५ जानेवारी रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. याप्रक्रीये दिव्यांग मतदारांना उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविता यावा करिता मनपा प्रशासनाद्वारे दिव्यांग मतदारांकारिता विशेष सोय करण्यात आली आहे.

मनपा आयुक्त तथा निवडणूक अधिकारी डॉ. अभिजीत चौधरी यांच्या मार्गदर्शनात मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांच्या नेतृत्त्वात मनपाने दिव्यांग मतदारांकारिता ९१७५४१४३५५ हा व्हॉट्सॲप क्रमांक निर्गमित केला आहे. यावर लोकेशन शेअर केल्यानंतर मतदान बूथ वर ये-जा करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याकरिता प्रत्येक झोन मध्ये एका वाहनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात या संदर्भात जनहित याचिका दाखल करण्यात आलेली असून, मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये दिव्यांग मतदारांसाठी मनपातर्फे ही विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मनपा निवडणुकीच्या अनुषंगाने दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रावर सुलभता व सहाय्यता करीत सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मनपा केंद्रीय कार्यालयात नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहे.

याद्वारे दिव्यांग मतदारांना मतदानाच्या दिवशी अर्थात गुरुवार १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत त्यांच्या निवास स्थानावरून मतदान केंद्र/ पोलिंग बूथ वर ने-आण करण्यासाठी प्रत्येक झोन मध्ये झोनल वैद्यकीय अधिकारी यांच्या पर्यवेक्षणाखाली एका वाहनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

दिव्यांग मतदारांना या सुविधेचा सुलभ वापर करता यावा यासाठी केंद्रीय स्तरावर ९१७५४१४३५५ हा व्हॉट्सॲप क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला आहे. दिव्यांग मतदारांना या व्हॉट्सॲप क्रमांकावर आपली लोकेशन शेअर करायची आहे किंवा ते कॉल करून देखील माहिती देऊ शकतात. केंद्रीय स्तरावर दोन सत्रात दोन चमूची नियुक्ती करण्यात आली आहे.या चमूमार्फत प्राप्त माहितीनुसार, झोन स्तरावरील अधिकाऱ्यांमार्फत कार्यवाही केली जाणार आहे. याकरिता दहा पथक नेमण्यात आले आहे.

# धनगर समाजाचा उपवर-वधु परिचय मेळावा संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

धनगर समाजातील उपवर वधूंचा परिचय मेळावा गेल्या दशकापासून धनगर युवक मंडळ नागपूर व महाराणी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला मंडळ नागपूर यांचे संयुक्त विद्यमाने सुरू असून या मेळाव्याच्या माध्यमातून अनेक विवाहाच्या रेशीमगाठी बांधण्याचे कार्य सुरू आहे. या मेळाव्याचे आयोजन 11 जानेवारी 2026 रोजी, श्री संताजी महाराज सभागृह नागपूर येथे मंडळाचे अध्यक्ष रमेश पाटील यांच्या अथक प्रयत्नाने करण्यात आले होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हरीदासजी भदे माजी आमदार उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटन दीपक बोराडे यांनी केले. व्यासपीठावर अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होती. व्यासपीठावरील मान्यवरांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. दीपक बोराडे यांनी आपल्या भाषणात स्व. बी.के.कोकरे यांच्या कार्याचा गौरव करून दि. 21 जानेवारी 2026 रोजी आझाद मैदान मुंबई येथे होऊ घातलेल्या धनगर एसटी आरक्षणाच्या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे धनगर बांधवांना आवाहन केले. हरिदासजी भदे यांनी स्व. रामदासजी शेटे गुरुजी यांना धनगर एसटी आरक्षणाचे जनक असे संबोधून त्यांनी धनगर आरक्षणाची मुहूर्तमेढ यवतमाळ येथे गाडली असे सांगून त्यांच्या कार्याचा गौरव केला. अनिलकुमार ढोले व पुरुषोत्तमजी डाखोळे यांनी आपल्या भाषणात उपवर वधू-वरांनी या मेळाव्याचा लाभ घ्यावा, असे सांगितले. मान्यवरांच्या हस्ते उपवधू वर परिचय पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले.

कार्यक्रमाचे संचालन व प्रास्ताविक डॉ. हर्षा पाटील यांनी केले त्यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणातून मंडळाच्या कार्याची सविस्तर माहिती दिली. ज्ञानेश्वर ढोमणे यांनी मंडळाच्या कायार्ची प्रशंसा केली. कार्यक्रमाला देविदासजी आगरकर, रामदास माहुरे, अशोक सांभारे, दीपक अवताडे, यशवंत कातरे, साहेबराव सरोदे, विलास डाखोळे, त्रिलोकचंद खरबडे, सुषमा कानडे, नीलिमा ढोके, प्रतिमा आगरकर, गणेश पावडे, व इतर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नागपूर विभागात तिकीट तपासणी मोहीम



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने दि. 10 जानेवारी 2026 रोजी विनातिकीट व अनियमित प्रवासाला आळा घालण्यासाठी तसेच रेल्वे महसूल वाढीच्या उद्देशाने सघन तिकीट तपासणी मोहीम राबविली. या मोहिमेअंतर्गत एकूण 24 गाड्यांमध्ये तिकीट तपासणी करण्यात आली. या सघन तपासणीसाठी 80 तिकीट तपासणी कर्मचारी, 02 रेल्वे संरक्षण दल कर्मचारी तसेच 05 वाणिज्य निरीक्षक सहभागी झाले होते. संपूर्ण मोहिमेवर विभागातील वाणिज्य अधिकाऱ्यांचे काटेकोर निरीक्षण होते.

तिकीट तपासणीदरम्यान विनातिकीट व अनियमित प्रवासाशी संबंधित एकूण 1068 प्रकरणे नोंदविण्यात आली. या कारवाईतून 6,91,745/- इतका लक्षणीय महसूल प्राप्त झाला. मोहिमेदरम्यान प्रति कर्मचारी सरासरी 8,646.81 इतका महसूल तसेच प्रति कर्मचारी 13.35 प्रकरणे नोंदविण्यात आली, ज्यामुळे मोहिमेच्या यशस्वीतेची प्रचिती येते.

मध्य रेल्वे, नागपूर विभाग प्रवाशांना आवाहन करतो की त्यांनी वैध तिकीटासहच प्रवास करावा व रेल्वे नियमांचे पालन करावे, जेणेकरून प्रवास सुरक्षित, सुलभ व त्रासमुक्त राहील. रेल्वे महसूल संरक्षण व प्रवासी शिस्त सुनिश्चित करण्यासाठी अशा सघन तिकीट तपासणी मोहिमा यापुढेही नियमितपणे राबविण्यात येतील.

# राणी लक्ष्मीबाई शाळा व कनिष्ठ महाविद्यालयात संयुक्त स्नेहसंमेलन संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
सावरगाव, दि. १४ :

शिंदे शिक्षण संस्था द्वारा संचालित राणी लक्ष्मीबाई प्राथमिक, माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने दिनांक 12 व 13 जानेवारी 2026 रोजी संयुक्त स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले. हे स्नेहसंमेलन विविध शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा उपक्रमांनी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.



स्नेहसंमेलनाचे उद्घाटन सतीश शिंदे आणि अंजली शिंदे यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून सावरगाव केंद्रप्रमुख ललिता सातपुते, नागपूर जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष विलीन आरघोडे, राणी लक्ष्मीबाई महिला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय करकरे उपस्थित होते. तसेच व्यवस्थापन समितीचे सदस्य प्रभुजी गायकवाड, वसंतराव पानतावणे, रमेश रेवतकर, मधुकर ठाकरे, ज्ञानेश्वर बालपांडे, दशरथ हवाले, प्रभु गायकवाड, राकेश बोधड, रवींद्र रेवतकर यांनी उपस्थिती दर्शविली.

स्नेहसंमेलनाच्या दोन्ही दिवसांच्या कार्यक्रमांचे प्रास्ताविक राणी लक्ष्मीबाई विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचे मुख्याध्यापक रमेश निहूल यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तारकेश्वरी आंबुलकर व गुरुदेव मेश्राम यांनी केले.

या स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. तसेच शाळेत आयोजित स्पोर्ट्स डे अंतर्गत घेण्यात आलेल्या क्रीडा स्पर्धांमधील विजेत्या व विविध क्षेत्रात गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. बक्षीस वितरण कार्यक्रमाचे संचालन शिक्षक गुरुदेव मेश्राम यांनी केले. यानंतर रंगारंग सांस्कृतिक कार्यक्रम व स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला राजकुमार मिश्रा, तुषार चरडे, महेंद्र प्रवीण वासाडे, मिथिल निंबाळकर, चंद्रशेखर क्षीरसागर, सिद्धार्थ पाटील, धर्मेंद्र गोस्वामी, किरणताई गोडबोले, राजश्री कडू, मनीषा सावंत उपस्थित होते.

स्नेहसंमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी राणी लक्ष्मीबाई प्राथमिक, माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयाच्या सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता आभार प्रदर्शनाने झाली. आभार प्रदर्शन लोचना बालपांडे यांनी केले.

# दवलामेटीत रक्तदान शिबीर

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १४ :

जगद्गुरू श्रीमद् रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या प्रेरणेने जीवनदान महाकुंभ २०२६ च्या निमित्ताने दवलामेटी ग्रामपंचायत येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरास परिसरातील रक्तदात्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमाला सरपंच गजानन रामेकर, ग्रा.पं. सदस्य प्रशांत केवटे, श्री साईनाथ कॉन्व्हेंट अँड ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य, रविंद्र पाखरे उपस्थित होते. आयोजनासाठी मंदाताई वानखेडे, अर्चना लोणारे, वंदना नागोसे, अनुश्री कांबळे, उज्ज्वला महाजन, अनिता पात्रीकर, रजनी नागोसे, शालू मडावी, सुखवंत टेंभरे, लिखणलाल टेंभरे, प्रणय वानखेडे, प्रतीक मडावी, मुकुंदा सिंगनमोडे, रेवाराम पात्रीकर व निखिल पात्रीकर यांनी सहकार्य केले.

# नंबर बदलून चालवत होता वाहन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

**आरोपीजवळून चाकूही जप्त**

गुन्हे शाखा युनिट ५ च्या पथकाने गस्तीदरम्यान एका वाहन चोराला अटक केली. झडतीमध्ये त्याच्याजवळ चाकूही मिळाला. फय्याज अंसारी एजाज अंसारी (२३) रा. भांडेवाडी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. शनिवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास युनिट ५ चे पथक यशोधरानगर ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान शासकीय कँसर रुग्णालयाजवळ पोलिसांना फय्याज एमएच-४०/एएम-०४९० क्रमांकाच्या मोटारसायकलने संशयास्पदरित्या फिरताना दिसला. पोलिसांना पाहताच त्याने वाहन सोडून पळ काढला. पाठलाग करून त्याला पकडण्यात आले. झडतीमध्ये पोलिसांना त्याच्याजवळ चाकू मिळाला. वाहनाची कागदपत्रे मागितली असता तो उडवा-उडवीची उत्तरे देऊ लागला. ठाण्यात आणून त्याची सखोल चौकशी केली असता तो वाहनाच्या मुळ नंबर एमएच-४०/बीएन-८५३६ मध्ये हेराफेरी करून चालवत असल्याचे समोर आले. त्याने ऑटोमोटीव्ही चौकातील मेट्रो स्टेशनच्या पार्किंगमधून ते वाहन चोरी केल्याची कबुली दिली.

## निधन वार्ता

### चंद्रशेखर वाडेगावकर



■ नागपूर : वेकोलिचे निवृत्त लेखाधिकारी आणि प्रसिद्ध कथालेखक चंद्रशेखर दिवाकर वाडेगावकर यांचे आज दुपारी दीर्घ आजारानंतर निधन झाले. त्यांचे वय 72 वर्षे होते. त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, सून, नातू आणि चाहत्यांचा मोठा परिवार आहे. सायंकाळी सहकारनगर घाटावर अंत्यसंस्कार पार पडला. चार मित्रलेखकांच्या "चौरंग" कथासंग्रहातील ते एक लेखक होते. आकाशवाणीसाठीही त्यांनी लेखन केले. चंद्रपूरचे नेते स्व. शांतारामजी पोटदुखे यांच्याशी त्यांचे घनिष्ठ संबंध होते.

### रामचंद्र बोरकर



■ नागपूर : रा. काचीपुरा नागपूर रहिवासी रामचंद्र सुखराम बोरकर ६७ यांचे निधन झाले. त्यांचे अंत्यसंस्कार अंबाझरी घाट येथे करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सुन, नातवंडे असा बराच मोठा आप्त परिवार आहे.

# सावरगांव-काटोल-पांढुर्णा राज्य महामार्गावर अतिक्रमणाचा विळखा

■ महासागर प्रतिनिधी
सावरगांव, दि. १४ :

सावरगांव ग्रामपंचायत हद्दीत तसेच काटोल-सावरगांव-पांढुर्णा राज्य महामार्गाच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर झालेल्या अतिक्रमणामुळे वाहतुकीस गंभीर अडथळे निर्माण झाले आहेत. रस्त्याच्या दुतर्फा वाढत चाललेल्या अतिक्रमणांमुळे अपघातांचे प्रमाण वाढत असून, नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

महामार्गाच्या कडेला टपऱ्या, हातगाड्या, दुकाने, बांधकाम साहित्य तसेच काही ठिकाणी कायमस्वरूपी स्वरूपाचे अतिक्रमण झाल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. त्यामुळे रस्त्याची रुंदी मोठ्या प्रमाणात घटली असून, वाहनचालकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः शालेय वाहने, रुग्णवाहिका व जड वाहनांची वाहतूक अत्यंत धोकादायक बनली असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

सध्या सावरगांव ग्रामपंचायतीत प्रशासक कार्यरत असून, या अतिक्रमणाबाबत वारंवार तक्रारी व लेखी माहिती देऊनही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही, असा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. अतिक्रमणाची माहिती असूनही प्रशासक व संबंधित यंत्रणा जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

ग्रामपंचायत प्रशासन व सार्वजनिक बांधकाम विभागाने संयुक्त पाहणी करून नियमबाह्य व कायमस्वरूपी अतिक्रमणे तातडीने हटवावीत, अशी जोरदार मागणी करण्यात येत आहे. याबाबत त्वरित कारवाई न झाल्यास ग्रामस्थांच्या वतीने आंदोलनाचा मार्ग अवलंबला जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

> "कोर्टाच्या आदेशाच्या पायमल्ली होत असून या अतिक्रमणामुळे नागरिकांच्या दैनंदिन वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत असून अपघातांची संख्या वाढत आहे. संबंधित प्रशासकीय विभागांनी हे प्रकरण गांभीर्याने घेऊन तात्काळ सर्व अतिक्रमणे हटवून महामार्ग मोकळा केला पाहिजे. काही व्यक्तींनी केलेले कायमस्वरूपी अतिक्रमण हटवणे अत्यावश्यक आहे."
>
> **सतीश शिंदे, माजी नागपूर जिल्हा परिषद कृषी सभापती**

## शस्त्राच्या धाकावर हैदोस

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

तहसील पोलिसांनी गस्तीदरम्यान एका व्यक्तीला शस्त्राचा धाक दाखवून परिसरात हैदोस घालत असताना अटक केली. रवी रंजीत बिरबल (३४) रा. खाटिकपुरा, टिमकी असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

रविवारी रात्री ९ वाजताच्या सुमारास तहसील पोलिसांचे पथक ठाण्यांतर्गत भानखेडा परिसरात गस्त घालत होते. या दरम्यान रमाबाई भवनसमोर बिरबल हा चाकूचा धाक दाखवून हैदोस घालताना आणि रस्त्याने ये-जा करणाऱ्यांना शिविगाळ करून धमकावताना दिसला. पोलिसांनी घेराबंदी करून त्याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून चाकू जप्त केला. तो काहीतरी गुन्हा करण्याच्या उद्देशाने परिसरात धुमधाम करीत असल्याचा संशय आहे. पोलिसांनी आर्म्स अ‍ॅक्ट व मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याचा गुन्हा नोंदवून बिरबलला अटक केली.

# तिडके महाविद्यालयात सायकल व खेळाचे साहित्य वाटप



■ महासागर प्रतिनिधी, रामटेक , दि. १४ :

श्री नरेंद्र तिडके कला व वाणिज्य महाविद्यालय, रामटेक येथील निसर्ग मंडळ व क्रीडा विभागाकडून विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक विकासासाठी सायकलसह सॉफ्टबॉल खेळांचे साहित्य वाटप करण्यात आले. निसर्ग व क्रीडा विभागाच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात क्रीडा क्षेत्रातील नेत्रदीपक कामगिरीबद्दल शिवराज परतेती यांना प्राचार्य डॉ.शरद पोकळे आणि डॉ.महेंद्र लोधी यांच्या शुभहस्ते सायकल वितरण करण्यात आली. तसेच भावेश मोहारे यांची सैन्य भरतीत नियुक्ती झाल्याने पुष्पगुच्छ देऊन उचित सन्मान करण्यात आला. यावेळी सॉफ्टबॉल खेळांचे विद्यार्थ्यांना साहित्य देण्यात आले याप्रसंगी प्राचार्यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबर, व्यक्तिगत करिअरसोबत खेळांमध्येही सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

या कार्यक्रमास प्राध्यापक, डॉ. स्वप्नील मनघे डॉ. बाळासाहेब लाड, प्रा. किशोर दांडे, प्रा. गणेश मरठे,क्रीडा मार्गदर्शक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी निसर्ग व क्रीडा विभाग तसेच विलास घोडाम, ईश्वर तांदूळकर, प्रेम सागर दुर्वे, स्वप्निल जिद्देवार इत्यादी विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम घेतले.

## रातुम नागपूर विद्यापीठांच्या ज्ञानस्त्रोत केंद्रात स्वामी विवेकानंद जयंती

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. व्ही. बी. उपाख्य भाऊसाहेब कोलते ज्ञानस्त्रोत केंद्र येथे स्वामी विवेकानंद जयंती कार्यक्रम सोमवार, दि. १२ जानेवारी २०२६ रोजी पार पडला. ज्ञानस्त्रोत केंद्र संचालक डॉ. विजय खंडाळ यांच्या शुभहस्ते स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पअर्पण करण्यात आले.

यावेळी सहाय्यक ग्रंथपाल डॉ. पूजा दाढे, अधीक्षक आनंद मेश्राम यांच्यासह अन्य कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

# वाडी नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी कल्पना सगदेव

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १४ :

वाडी नगरपरिषदेच्या निवडणुका पार पडल्यानंतर उपनगराध्यक्षपदासाठी राजकीय हालचालींना वेग आला होता. बुधवार १४ जानेवारी रोजी आमदार समीर मेघे यांच्या नेतृत्वाखाली व नगराध्यक्ष नरेश चरडे यांच्या मार्गदर्शनात भाजपाच्या बहुमताधारित नगरसेवकांनी प्रभाग क्रमांक ४ मधील नगरसेविका कल्पना किशोर सगदेव यांची उपनगराध्यक्षपदी निवड झाली आहे.



## सत्तापक्ष व विरोधकांकडून मनोनीत सदस्यांची निवड

उपाध्यक्षपदासाठी भाजपातर्फे कल्पना सगदेव तर वंचित महाविकास आघाडी तर्फे राजेश थोराने यांनी अर्ज सादर केला होता. कल्पना सगदेव यांना १८ मते तर राजेश थोराने यांना १० मते मिळाली. पिठासिन अधिकारी म्हणुन मुख्याधिकारी डॉ. ऋचा धाबर्डे यांनी कामकाज पाहीले.

कल्पना सगदेव यांनी यापूर्वी शिक्षण सभापतीपदाची जबाबदारी यशस्वीरीत्या सांभाळली होती. शिक्षण क्षेत्रातील त्यांचे योगदान, परिश्रमशील कार्यपद्धती व समाजाभिमुख नेतृत्व लक्षात घेऊन भाजप नेतृत्वाने त्यांच्यावर उपनगराध्यक्षपदाची जबाबदारी सोपविली. पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी पक्ष नेतृत्व व सर्व नगरसेवकांचे आभार मानत, शहराच्या विकासासाठी कटिबद्धतेने काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

भाजपकडून दोन मनोनीत नगरसेवकांचीही घोषणा करण्यात आली. यामध्ये भाजप वाडी मंडळ अध्यक्ष व माजी नगरसेवक कैलास मंथापुरवार तसेच निवडणूक काळात पक्षासाठी सक्रिय व निःपक्षपातीपणे काम करणारे शंकर कडू यांची मनोनीत नगरसेवक म्हणून नियुक्ती करण्यात आली. या निर्णयामुळे नगरपरिषदेत भाजपची ताकद अधिक बळकट झाली आहे.

विरोधी गटाकडील मनोनीत सदस्य निवडीकडे सर्वांचे लक्ष लागले होते. वंचित बहुजन आघाडीचे ३, राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार गट) ३, कॉंग्रेस १, शिवसेना (उद्धव ठाकरे गट) १ तसेच एका अपक्ष महिला नगरसेविकेच्या पाठिंब्याने बसपाचे माजी नगरसेवक नरेंद्र मेंढे यांची मनोनीत नगरसेवक म्हणून निवड झाली. या निर्णयामुळे सभागृहात राजकीय उत्सुकता आणि रंगत निर्माण झाली.

मनोनीत झाल्यानंतर नरेंद्र मेंढे भावूक झाले. आपल्या मनोगतात त्यांनी सर्व नगरसेवकांचे आभार मानत, आंबेडकरवादी विचारधारा व सामाजिक न्यायासाठी सातत्याने कार्यरत राहण्याचा निर्धार व्यक्त केला. विरोधकांकडून वंचित महाविकास आघाडीच्या रूपाने गट स्थापन झाल्याने आगामी बैठकीत प्रभावी भूमिका बजावण्याचे संकेत मिळाले आहेत.

वाडी नगरपरिषदेची संपूर्ण रचना आता अस्तित्वात आली आहे. येत्या आठवड्यात विविध सभापती पदांसाठी निवड प्रक्रिया पार पडण्याची शक्यता आहे. सत्ताधारी पक्षातील वरिष्ठ नगरसेवकांना संधी मिळण्याची चर्चा आहे.उपनगराध्यक्ष व मनोनीत सदस्यांच्या निवडीसह वाडी नगरपरिषदेच्या राजकारणाने नवी दिशा घेतली असून, आता सर्वांचे लक्ष आगामी सभापती निवडीकडे लागले आहे.

## आरपीएफ जवानाच्या सतर्कतेमुळे प्रवाशाचा जीव वाचला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाअंतर्गत आरपीएफ चंद्रपूर येथे कार्यरत असलेल्या आरक्षकाच्या सतर्कता, धैर्य व तत्परतेमुळे मोठा रेल्वे अपघात टळला. रेल्वेगाडी सुटत असताना तोल जाऊन खाली पडण्याच्या स्थितीत असलेल्या एका प्रवाशाचा जीव वेळेत वाचविण्यात आला. ही घटना प्लॅटफॉर्म क्रमांक 02 वर घडली. गाडी क्रमांक 12625 स्थानकावरून रवाना होत असताना एक प्रवासी तोल जाऊन चालती गाडी आणि प्लॅटफॉर्म यांच्या मधोमध घसरून खाली पडण्याच्या स्थितीत आला. परिस्थिती अत्यंत गंभीर होती. याच वेळी शिफ्टमध्ये ड्युटीवर असलेले आरपीएफ आरक्षक अभिषेक टेकचंद यांनी प्रसंगावधान राखत अत्यंत धैर्याने व तत्परतेने कारवाई केली. त्यांनी क्षणाचाही विलंब न करता प्रवाशाला घट्ट पकडून सुरक्षितपणे प्लॅटफॉर्म/डब्याच्या आत ओढून घेतले, त्यामुळे मोठा अनर्थ टळला आणि प्रवाशाचा जीव वाचला.

आरक्षकाच्या या तात्काळ कृतीमुळे केवळ एका प्रवाशाचा जीव वाचला नाही, तर स्थानकावर उपस्थित असलेल्या इतर प्रवाशांमध्येही सुरक्षिततेचा विश्वास निर्माण झाला. कोणतीही जीवितहानी अथवा रेल्वे मालमत्तेचे नुकसान झाले नाही.

# गाड्‌र्स रेजिमेंटल सेंटर येथे आंतर-शालेय प्रश्नमंजुषा स्पर्धा



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

लष्कर दिनाच्या उत्सवाचा एक भाग म्हणून, आर्मी पब्लिक स्कूल, कामठी, द ब्रिगेड ऑफ द गाड्‌र्स रेजिमेंटल सेंटरच्या नेतृत्वाखाली, १३ जानेवारी रोजी जीआरसी कामठी येथील सोधी सभागृहात आंतर-शालेय प्रश्नमंजुषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

या कार्यक्रमाचा उद्देश देशभक्तीला चालना देणे, भारतीय सैन्याच्या नीतिमत्ता आणि मूल्यांबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि विद्यार्थ्यांमध्ये नागरी-लष्करी संबंध मजबूत करणे हा होता. आठवी ते बारावी इयत्तेत शिकणाऱ्या नागपूर आणि काम्टी येथील सहा प्रमुख शाळांमधील विद्यार्थ्यांनी उत्साहाने भाग घेतला.

सहभागी शाळांमध्ये आर्मी पब्लिक स्कूल, कामठी (यजमान), दिल्ली पब्लिक स्कूल, कामठी, सेंट जोसेफ कॉन्व्हेंट स्कूल, केंद्रीय विद्यालय, सांदीपनी स्कूल आणि सेंट जॉन पब्लिक स्कूल यांचा समावेश होता. या स्पर्धेत निरोगी स्पर्धा दिसून आली आणि सहभागींमध्ये मजबूत शैक्षणिक तयारी आणि राष्ट्रीय जागरूकता दिसून आली.

शौर्य चक्र पुरस्कार विजेते आणि राष्ट्रीय स्तरावर प्रसिद्ध क्विझ मास्टर कर्नल वेम्बू शंकर (निवृत्त) यांनी क्विझचे आयोजन केले. भारतीय सशस्त्र दलांवरील विशेष फेरीसह त्यांच्या आकर्षक वर्तनामुळे कार्यक्रम माहितीपूर्ण आणि चैतन्यशील झाला.

मेजर जनरल एन एस सोहल, जनरल ऑफिसर कमांडिंग, यूएम आणि जी सब एरिया, यांनी प्रमुख पाहुणे म्हणून कार्यक्रमाची शोभा वाढवली. त्यांच्या भाषणात, त्यांनी दरवर्षी १५ जानेवारी रोजी साजरा केल्या जाणाऱ्या आर्मी डेचे महत्त्व अधोरेखित केले आणि विद्यार्थ्यांना शिस्त, सचोटी, समर्पण आणि राष्ट्रसेवेची मूल्ये आत्मसात करण्यास प्रोत्साहित केले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉ स्कूल येथे व्याख्यान

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉ स्कूल येथे स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीदिनी राष्ट्रीय युवक दिनाच्या निमित्ताने दि. १२ जानेवारी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. 'व्यवसायातील तरुण वकील : संधी, आव्हाने आणि नैतिकतेचा उत्कृष्ट मार्ग' या विषयावर मुंबई उच्च न्यायालयातील अधिवक्ता ॲड. पारिजात पांडे यांनी मार्गदर्शन केले.



माननीय कुलगुरू डॉ.मनाली क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली व संचालक डॉ.रवीशंकर मोर यांच्या नेतृत्वात आयोजित कार्यक्रमाला व्याख्याते म्हणून मुंबई उच्च न्यायालयातील अधिवक्ता ॲड.पारिजात पांडे, डॉ. अधरा देशपांडे, डॉ.पायल ठावरे यांची उपस्थिती होती. राष्ट्रीय युवा दिन हा स्वामी विवेकानंद यांच्या आदर्शांचे, तत्वज्ञानाचे आणि विचारांचे स्मरण करीत युवकांची राष्ट्र उभारणीत भूमिका अधोरेखित करते. या कार्यक्रमात विभागातील माजी विद्यार्थी तसेच मुंबई उच्च न्यायालयाचे अधिवक्ता ॲड. पारिजात पांडे यांना मुख्य अतिथी म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना डॉ. पायल ठावरे यांनी राष्ट्रीय युवा दिवस आणि स्वामी विवेकानंद यांच्या विचारांची आधुनिक विधी व्यवसायात कशाप्रकारे आवश्यकता आहे, याबाबत माहिती दिली. त्यानंतर ॲड. पारिजात पांडे यांनी 'व्यवसायातील तरुण वकील : संधी, आव्हाने आणि नैतिकतेचा उत्कृष्ट मार्ग' या विषयावर अतिथी व्याख्यान दिले. विधीक्षेत्रात उपलब्ध असलेल्या विविध करियर संधींबाबत त्यांनी विस्तृत माहिती दिली. वाद-विवाद (लिटिगेशन), कॉर्पोरेट प्रैक्टिस, वैकल्पिक विवाद निवारण (अआ) तसेच आधुनिक विधीक्षेत्राबाबत विस्तृत मार्गदर्शन केले. ॲड. पारिजात पांडे यांनी विधी व्यवसायात नैतिकतेला असलेले महत्त्व सांगितले.

व्याख्यानानंतर चर्चासत्र आयोजित करण्यात आले. डॉ. अधरा देशपांडे यांनी ॲड.पांडे यांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे समन्वयन डॉ. पायल ठावरे यांनी केले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. शिखा गुप्ता यांनी केले. कार्यक्रमाला ९० पेक्षा अधिक शिक्षक, संशोधक तसेच विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार डॉ.अधरा देशपांडे यांनी मानले. विद्यार्थी समन्वयक श्री शेष नारायण तिवारी तसेच अन्नपूर्णा पारधी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष प्रयत्न केले.

# १८ जानेवारीला शिक्षक परिषदेचे नागपूर जिल्हा अधिवेशन



■ महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. १४ :

महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद नागपूर ग्रामिण जिल्ह्याचे जिल्हा अधिवेशन डोणेकर सभागृह कन्हान येथे दि. 18 जानेवारी 2026 ला संपन्न होत आहे. या अधिवेशनात शिक्षण क्षेत्रातील ज्वलंत समस्यांवर विचारमंथन होणार आहे. तेंव्हा हिंगणा तालुक्यातील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहुन म.रा.शिक्षक परिषदेला बळकट करण्याचे आवाहन माजी आमदार नागो गाणार, नागपूर जिल्हा अध्यक्ष मिनानाथ सातपुते,कार्यवाह राजीव तांदुळ कर, पालक सुधीर वारकरी, सहकार्यवाह धनंजय जिचकार, हिंगणा तालुका पदाधिकारी मनोज नेहाने, नितीन आष्टणकर व संतोष आत्राम यांनी हिंगणा तालुक्यातील विविध शाळेत भेटी देऊन अधिवैशनाचे निमंत्रण दिले.

अधिवेशनात सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना जुनी पेन्शन योजना लागू करणे, शिक्षक पात्रता परीक्षा शिक्षक पात्रता परीक्षा उत्तीर्ण नसलेल्या शिक्षकांना सेवा संरक्षण देणे, चतुर्थ श्रेणी शिक्षकेतर कर्मचारी आकृतीबंध घोषित करणे, दह, विस व तीस वर्षे सेवेनंतर सरसकट विनाअट सर्वांना आश्वासित प्रगती योजना लागू करणे, बीएलओ जनगणना व इतर अशैक्षणिक कामे शिक्षकांना व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना न देणे, अनुकंपा तत्त्वावरील नियुक्तीस मान्यता देणे, वरिष्ठ व निवड वेतनश्रेणी विनाड सरसकट लागू करणे, बालसंगोपन रजा संदर्भात शिक्षण विभागाचा शासन निर्णय त्वरित निर्गमित करणे व प्रलंबित शालार्थ आय.डी. तात्काळ निर्गमित करणे व ऑनलाईन शालार्थ मध्ये समाविष्ट करणे इत्यादी मागण्यावर सविस्तर चर्चा होणार आहे.

# सफाई कर्मचाऱ्यांकडून मतदान पावत्यांचे वाटप?

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

प्रभाग क्रमांक ७ इंदोरा येथील मॉडेल टाऊन परिसरात सफाई कर्मचारी घरोघरी जाऊन मतदान पावत्या वाटत असल्याचे चित्र समोर आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून प्रशासनाच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.



## प्रभाग ७ येथील मॉडेल टाऊनमध्ये खळबळ

स्थानिक नागरिक विजय सहारे यांनी सांगितले की, संबंधित सफाई कर्मचारी आपली मूळ जबाबदारी असलेली स्वच्छतेची कामे नीट पार पाडत नाहीत. जागोजागी कचऱ्याचे पुंजके तसेच ठेवले जातात. याबाबत जाब विचारल्यास हे कर्मचारी उद्धटपणे वागतात व नागरिकांवरच तोंड करून येतात, असा आरोप त्यांनी केला.

अशा परिस्थितीत हेच सफाई कर्मचारी मतदान पावत्यांचे वाटप करत असल्याचे दिसून येत असून, हे काम त्यांना कोणी व कोणाच्या आदेशाने दिले, याचा प्रशासनाने तात्काळ शोध घ्यावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. मतदान प्रक्रियेप्रमाणे संवेदनशील बाबीत अशा प्रकारची निष्काळजीपणा गंभीर असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी राजेश वासनिक, नवीन शहारे, अजय सहारे, विनय घरडे, प्रभू गजभिये, हेमराज जांभूळकर, प्रशांत साखरे, राजेश पांडे, अनुप राहाटे, अंबरीश रामटेके आणि संदीप चौधरी यांनी संयुक्तपणे केली आहे.

# डॉ.आंबेडकर नगरात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १४ :

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त डॉ. आंबेडकर नगरातील सर्व बुद्ध विहारात वाडी शहर कॉंग्रेस तर्फे फुले दाम्पत्याची प्रतिमा भेट स्वरूपात देण्यात आल्या. या निमित्ताने मिठाईचे वितरण करण्यात आले.

नागपूर जिल्हा कॉंग्रेस कमिटी अध्यक्ष यांच्या प्रमुख उपस्थितीत माजी जि प. सदस्य प्रेम झाडे यांच्या हस्ते डॉ.आंबेडकर नगरातील सर्व बुद्ध विहारात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. सिद्धार्थ चौकातील स्मृतीं बुद्ध विहारात विक्रम कोटांगले व अमर तागडे यांना प्रेम झाडे यांच्या तर्फे फुले दाम्पत्याची प्रतिमा भेट स्वरूपात देण्यात आली, यावेळी किशोर नागपूरकर, नंदू सोमकुवर,प्रफुल्ल मेश्राम, अश्विनी झा, सविता राऊत नंदा खडसे आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

# अत्याधिक वेगाने घेतला तरुणाचा बळी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :

अत्याधिक वेगामुळे वळणावर नियंत्रण सुटले आणि दोन मित्र वाहनासह थेट नाल्यात पडले. यात एकाचा जागीच मृत्यू झाला, तर दुसरा गंभीर जखमी आहे. ही थरारक घटना हिंगणा पोलिस ठाण्यांतर्गत उकळी मार्गावर घडली. सौरभ अरुण डंभारे (२४) रा. कटरे लेआऊट, जागेश्वरपुरी, हिंगणा असे मृताचे नाव आहे. त्याचा मित्र तेजस धनराज मरसकोल्हे (२३) याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून त्याची प्रकृतीही चिंताजनक आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शनिवारी सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास सौरभ हा त्याचा मित्र तेजस याच्यासोबत त्याच्या एमएच-४०/सीएल-८९४१ क्रमांकाच्या दुचाकीवर बसून उकळी रोडने जात होता. या दरम्यान वाहनाची गती खूप जास्त होती. विदर्भ बिल्डिंगसमोर नाल्याजवळील वळणावर अत्याधिक गतीमुळे तेजसचे वाहनावरून नियंत्रण सुटले. अनियंत्रित वाहनासह दोघेही थेट नाल्यात पडले.

# रामानंदी संप्रदायातर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १४ :

दत्तवाडी येथील गजानन सोसायटी मधील श्री संत गजानन महाराज मंदीरात रामानंदी संप्रदायातर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन संत गजानन महाराज मंदिराचे अध्यक्ष श्रीराम बाटवे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी नगराध्यक्ष नरेश चरडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेश तटकरे, नगरसेविका कल्पना सगदेव, सरिता यादव, रेखा गोविंद रोडे, पूर्वा हर्षल काकडे, दीपक दुधाने, मधु मानके पाटील,अखिल पोहनकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

रामानंदी संप्रदायातील भक्त-शिष्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. या शिबिरात एकूण १३० रक्तकुपिका संकलित करून महाराष्ट्र शासनाकडे सुपूर्द करण्यात आल्या. दि. १८ जानेवारीपर्यंत संपूर्ण महाराष्ट्रात २ लाख रक्तकुपिका देण्याचा संकल्प रामानंद संप्रदायाने केला आहे.

कार्यक्रमाचे आयोजन पूर्व विदर्भ पीठ व जिल्हा समितीच्या मार्गदर्शनाखाली हिंगणा तालुका समितीने यशस्वीपणे केले.

# योग नृत्य परिवारातर्फे मतदान जनजागृती रॅली

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

योग नृत्य परिवार चिटणीस नगर तर्फे मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. रॅलीमध्ये १००ते १२५ महिला व पुरुषांचा सहभाग होता. संस्थेतर्फे नियमित समाजासाठी अभिनव व स्तुत्य उपक्रम हाती घेतले जातात. प्रथम चिटणीस नगर बगीचामध्ये जनजागृतीपर फलक आणि बॅनर द्वारे मतदान आणि लोकशाही, संविधान मुल्यांचा प्रचार प्रसार नितीन बर्गे, मोरेश्वर दुरुगकर यांनी नाट्यमय पद्धतीने साजरा केला. उपस्थित जनसमुदायाला मा. परमेश्वर राऊत यांनी मतदानाचे महत्त्व, लोकशाही समृद्ध करण्यासाठी नागरिकांनी अत्यंत सजग पध्दतीने जागरूक असण्याची गरज




असल्याचे सांगितले.

पुढे ही रॅली दिघोरी परिसरातील प्रगती मैदान येथे गेली, त्या ठिकाणी सुध्दा मतदानाचे महत्त्व, आणि महानगरपालिका निवडणुकीची निवड प्रक्रिया समजावून सांगितली. मोटार सायकलने ही रॅली पुढे रमणा मारोती मार्गे, ईश्वर नगर चौकात जाऊन तिथे सुध्दा पंथनाट्याच्या स्वरूपात निवडणूक प्रक्रिया लोकांना समजून सांगितली गेली. कार्यक्रमाच्या सफल आयोजनासाठी शरद वानखेडे, महेश बानते, गिरीश निमकर,सागर राऊत, रोशन गोतमारे, शिंदे साहेब, मनोज दलाल, श्री आतिलकर शंकर मौर्य, मनोज कुंभारे, दिलीप कोचे, सचिन तिडके, गजानन कांबळे, सौरभ राऊत, सुशांत राऊत,राकेश सदोकर, तीरथ ढोक, सुनील खानोरकर, घोडे साहेब, निर्वाण साहेब, भूषण काथोटे, राजेंद्र करंडे, राजेंद्र काकडे, दीपक समर्थ, अजय बालपांडे, ममता मते, अंजली आतीलकर, अमित मुरडिया, विनोद श्रीवास्तव, भुरे साहेब, वैद्य साहेब, समर्थ साहेब, मनोज कुंभार, विजय पावणेकर, चंदा राऊत, दुर्गे ताई आणि योग नृत्य परिवारातील सर्व महिला सदस्य आणि पुरुष सदस्य यांचे सहकार्य लाभले.

# ५२,४०६ वाहन चालकांवर कारवाई

नागपूर : वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण ५२,४०६ वाहन चालकांवर कारवाई करून १९,९७,७०० रुपयांचा दंड वसूल केला. त्याचप्रमाणे शहर पोलिसांनी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये १२ व एनडीपीएस अन्वये १ अशा १३ प्रकरणात १४ आरोपींवर कारवाई करून ६,६६,८०० रुपयांचा माल जप्त केला. तसेच जुगार कायद्यान्वये ५ प्रकरणात १० आरोपींवर कारवाई करून ६७,६२५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलिसांतर्फे राबविण्यात आली.

# चोरीच्या वाळूसह ट्रॅक्टर जप्त

■ नागपूर : खापरखेडा पोलिसांनी गस्तीदरम्यान वारेगाव परिसरात चोरीच्या वाळूची वाहतूक करणारा ट्रॅक्टर पकडला. मात्र अंधाराचा फायदा घेत ट्रॅक्टर चालक आणि मालक फरार झाले. रात्री १ वाजताच्या सुमारास खापरखेडा पोलिस ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. या दरम्यान मौजा वारेगाव परिसरात पोलिसांना एमएच-४०/सीए-९८६८ क्रमांकाचा ट्रॅक्टर दिसला. ट्रॅक्टरमध्ये वाळू होती. पोलिस विचारपूस करण्यासाठी ट्रॅक्टरकडे जाताच चालकाने खाली उतरून पळ काढला. पोलिसांनी ट्रॅक्टरसह वाळू जप्त केली. तपासात ट्रॅक्टरचा मालक बीना संगम परिसरात राहणारा सुभाष गणेश भोंडे आणि चालक आकाश विजय चौरे असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी दोघांविरुद्धही चोरीचा गुन्हा नोंदविला आहे.

# नवनिर्वाचित नगराध्यक्ष यांचा पदग्रहण सोहळा

■ महासागर प्रतिनिधी, कामठी, दि. १४ :

कामठी नगर परिषदेत निवडुन आलेले नवनिर्वाचित नगराध्यक्ष अजय रुपनारायन अग्रवाल आणि नगर सेवक याचा आज दिनांक १५ जानेवारीला पदग्रहण सोहळा होणार आहे. त्यानंतर उपाध्यक्ष पदाची निवडणुक झाल्यावर नगराध्यक्ष यांच्या बरोबरच नगरी सेवकांकडे नगर परिषदेचा कारभार येणार आहे.

निवडणुकीत अजय अग्रवाल हे १०३ मतांनी विजयी झाले. त्यासोबतच भाजपचे ८ नगर सेवकही विजयी झाले. नवनियुक्त नगराध्यक्ष अजय अग्रवाल हे १५ जानेवारीला सायंकाळी ६ वाजता महाराष्ट्राचे महसूल मंत्री व नागपुर जिल्हा पालक मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत आपला पदभार स्विकारणार आहेत. तसेच कामठी न.प. च्या कामठी नगर विकास आघाडीत प्रभाग १५चे नगर सेवक लालसिंग यादव हे गट नेतेपदी निवडुन आले.

त्याचप्रमाणे कामठी नगर विकास आघाडी गटा मध्ये नगराध्यक्षसह भाजपचे ८ अजित पवार गटाचे ४, बसपाचे ३, समाजवादी पक्षाचा १, बरिएम १, व अपक्ष १ असे भाजप प्रणित गटात एकुण २० सदस्य संख्या झाली.

तर कॉंग्रेस कडे १४ नगरी सेवक असल्यामुले कॉंग्रेसला विरोधी गटातून नेत्रुत्व करण्याची संधी मिळणार आहे.

कामठी शहरातील आरोग्य, पाणी, रस्ते, नाल्या अशा मुलभुत समस्या सोडविण्या करिता अजय अग्रवाल यांना कसरत करावी लागेल. त्याचप्रमाणे नगर परिषदेचे उत्पन्न वाढविण्यास लक्ष द्यावे लागेल. विरोधक प्रत्येक कारभारावर नजर ठेवुन तगडे आवाहन उभे करू शकतात.

# नागरिकांच्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांची हिंगण्यात आढावा बैठक

■ महासागर प्रतिनिधी,
हिंगणा, दि. १४ :

तालूक्यातील नागरिकांच्या समस्यावर तातडीने उपाययोजना करण्यासाठी तहसिल कार्यालय हिंगणा येथे आज जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर व जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी यांचे अध्यक्षतेखाली विशेष आढावा बैठक व जनसंवाद कार्यक्रम पार पडला. आज दुपारी तहसील कार्यालयाच्या सभागृहात आयोजित या बैठकीला महसूल मंत्री यांचे विशेष कार्यअधिकारी सुभाष चौधरी,नागपूर उपविभागीय अधिकारी वंदना सवरंगपते उपस्थित होते.

सुरवातीला जिल्हाधिकाऱ्यांनी सर्व विभागांच्या कामकाजबाबत सखोल आढावा घेवून सर्वसामान्य जनतेची कामे कालमयार्देत पूर्ण करण्याचे सख्त निर्देश अधिकाऱ्यांना दिले.यामध्ये महसूल फेरफार नोंदी,




मालकी हक्काचे प्रश्न, सवासांठी घरे योजनेतील अडचणी, पांधन रस्त्यावरील अतिक्रमण, पाणी पुरवठा, तलावाचे प्रश्न, बॅंक कर्ज व शेतीविषयक समस्या, तुकडेबंदी कायदा बाबत शासन निर्णयानुसार कार्यवाही करणे, ॲग्रिस्टॅक अंतर्गत शेतक-याची १०० टक्के नोंदणी, घरकुल योजनेची प्रभावीपणे अमंलबजावणी करण्यावर विशेष भर देण्यास सांगितले, घरकुल योजने अंतर्गत मोफत वाळू वाटप प्रभाविपणे करणे तसेच अवैध गौण खनिजाचे उत्खनन होणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश दिले, मुख्यमंत्री बळीराजा शेत पांदण रस्ते योजना प्रभाविपणे अमंलबजावणीचे निर्देश दिले. तसेच नागरिकांकडून आज प्राप्त झालेल्या १७ तक्रार अर्ज ठराविक कालमयार्देत निकाली काढण्याचे निर्देश दिले.

सदर बैठकीस अतिरिक्त जिल्हाधिकारी, अतिरिक्त कार्यपालन अधिकारी, तहसिलदार रुणय जककुलवार, गटविकास अधिकारी संदीप गोळशलवार, भूमी अभिलेख अधीक्षक आशा कडू,कृषी अधिकारी सरनाईक, वन परिक्षेत्र अधिकारी शीतल कनार्से, नगर परिषद डिंगडोह, वानाडोंगरी नगर पंचायत हिंगणा व निलडोहचे चे मुख्याधिकारी रामेश्वर पंडागळे, राहुल परिहार, धनंजय सरनाईक, योगिता डांगरे, सार्वजनिक बांधकाम विभाग, महवितरण, बॅंकेंचे प्रतिनिधी, मंडळ अधिकारी, तलाठी तसेच कर्मचारी उपस्थित होते.

# मनसे व कॉंग्रेसच्या कार्यकर्त्यांचा भाजपात प्रवेश

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. १४ :

दवलामेटी सर्कलमधील लाव्हा-सोनबानगर, परिसरातील महाराष्ट्र नवनिर्माण सेना व कॉंग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर पक्षप्रवेश केला. आमदार समीर मेघे यांच्या नेतृत्वाखाली होत असलेल्या विकासकामांमुळे प्रेरित होऊन आम्ही भाजपमध्ये प्रवेश घेत असल्याचे कार्यकर्त्यांनी सांगीतले. यावेळी लाव्हाच्या सरपंच ज्योत्सना नितनवरे, अनुसूचित जाती मोर्चा, जिल्हाध्यक्ष सुजित नितनवरे , वाडी न.प. नगरसेवक आनंदबाबू कदम नगरसेवक दिनेश कोचे, दवलामेटी सर्कल अध्यक्ष प्रकाश डवरे, अनिल पाटील, जितेश पिडेकर, राजू धारगावे, विजय बर्वे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. मनसे पक्षातून रोशन रामटेके, अश्विन रामटेके, प्रितेश गजभिये, सागर कामडीकर, रिंकेश उंदरवाडे, निखील गावंडे, शुभम बिसेन, गौरव विनायत, दिनेश ठाकरे, राजेश ठाकरे, भारत बोडखे, विनोद पटले, निलेश धामने, निखील रंगारी, गणेश मानकर व इतर कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला.

# भारतीय सैन्यदलात मुलींना नोकरीच्या अनेक संधी : कॅप्टन अजय हरोलीकर



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

नौदल, सेना व वायुसेनेमधील अधिकारी पदांसाठीच्या संधी, योग्यता, परीक्षा प्रक्रिया आणि तयारीच्या पद्धतींवर सविस्तर प्रकाश टाकताना कॅप्टन अजय हरोलीकर यांनी भारतीय सैन्यदलात विविध प्रवेशमार्गांची तपशीलवार माहिती दिली. सैन्यदलातील फायदे, आव्हाने आणि जबाबदाऱ्यांबद्दल त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

नंदनवन येथील महिला महाविद्यालयात मुलींना भारतीय नौदल, सेना व वायुसेनेत करिअर संधींवर एक मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे मुख्य पाहुणे सेवानिवृत्त भारतीय नौदल अधिकारी कॅप्टन अजय हरोलीकर होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष रवींद्र फडणवीस होते.

रवींद्र फडणवीस यांनी स्त्री सक्षमीकरणाचा महत्त्वाचा मुद्दा मांडताना सांगितले की, विद्यार्थिनींनी आर्थिक स्थैयार्साठी चांगले शिक्षण घेणे आवश्यक आहे. आर्थिक स्वावलंबनामुळेच महिला सक्षमीकरणाला गती मिळू शकते, त्यासाठी सर्वांनी उच्च शिक्षणाकडे लक्ष केंद्रित करावे. प्राचार्य डॉ. राष्ट्रपाल गणवीर यांनी सैन्यदलातील सेवेचे गौरव व त्या क्षेत्रातील संधींचे महत्त्व विद्यार्थ्यांसमोर ठेवले.

प्रा. सचिन वाल्दे आणि डॉ. अपर्णा घुसे या कार्यक्रमात उपस्थित होते. डॉ. अमित तितरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले.

## अंत्यविधी सुरू असतानाच हलले पाय
# १०3 वर्षांच्या आजीला नवजीवन

■ महासागर प्रतिनिधी,
रामटेक, दि. १४ :

रामटेकमध्ये राहणाऱ्या एका कुटुंबाने मृत्यू आणि जीवनाच्या सीमारेषेवर उभे राहून थक्क करणारा अनुभव घेतला. १०३ वर्षांच्या गंगाबाई सावजी साखरे यांना मृत घोषित करून अंत्यविधीची तयारी पूर्ण झाली होती. नाकात कापूस ठेवण्यात आला, हातपाय बांधणे सुरू होते. अचानक आजीबाईने पायाची बोटे हलवली आणि साऱ्यांनाच धक्का बसला. विशेष म्हणजे आजीबाईंचा १३ जानेवारीलाच वाढदिवस होता. त्यामुळे आईबाईचा यावेळी अंत्यविधी ऐवजी घरात साधेपणाने नवजीवनाचा वाढदिवस साजरा केला गेला.



आजीबाईचे नाव गंगाबाई सावजी साखरे असून त्या १०३ वर्षांच्या आहे. त्या दोन महिन्यांपासून अंथरुणाला खिळलेल्या होत्या. आजारपणामुळे त्या दोन चम्मच पाण्यावर दिवस काढत आहे. गंगाबाई यांच्या मृत्यूची वार्ता नातेवाईकांपर्यंत पसरली. अंत्यविधीची तयारी पूर्ण झाली. नाकात कापूस ठेवण्यात आला. हातापायांची बोटे बांधण्यात आली. अंत्यविधीची प्रक्रिया सुरू असतांना अचानक आजीबाईने पायाची बोटे हलवली. त्या जिवंत असल्याचे समजले. त्यामुळे उपस्थितांमध्ये खळबळ उडाली. गंगाबाई या मूळच्या चारगाव (ता. रामटेक) येथील रहिवासी आहे. सध्या रामटेकच्या आंबेडकर वॉर्डात मुलगी कुसुमा अंबादे यांच्या घरी राहतात. १२ जानेवारी रोजी सायंकाळी सुमारे पाच वाजता त्यांच्या शरीराच्या हालचाली थांबल्याचे दिसताच कुटुंबीयांनी त्यांना मृत समजले.

नातेवाईकांना फोनवरून निरोप देण्यात आला. समाज माध्यमांवरून नातेवाईक व कौटुंबिक मित्रांना निधन वार्ता दिली गेली. घरासमोर मंडप उभारण्यात आला. अंत्यविधीची वेळ ठरवण्यात आली आणि शववाहिका निश्चित करण्यात आली. गंगाबाईना नवीन वस्त्रे घालून हात- पायांची बोटे बांधण्यात आली. नाकात कापूस ठेवण्यात आला. दरम्यान, दोन तासांनी सायंकाळी सुमारे सात वाजण्याच्या सुमारास नातू राकेश साखरे यांच्या लक्षात आले की आजीच्या पायाची बोटे हलवली. त्वरित बोटांची बांधणी सोडण्यात आली. नाकातील कापूस काढताच गंगाबाईनी जोरात श्वास घेतला ही बाब समजताच उपस्थितांचा क्षणभर विश्वासच बसेना. अंत्यविधीची सर्व तयारी रद्द करण्यात आली.

### वाढदिवस झाला संस्मरणीय

निधनाची वार्ता मिळाल्यानंतर जम्मू-काश्मीर, बालाघाटसह दूरच्या भागांतून नातेवाईक रामटेककडे निघाले होते. काहीजण तर हार घेऊन पोहोचले. मात्र आजी जिवंत पाहून सगळेच स्तब्ध झाले. विशेष म्हणजे १३ जानेवारी रोजी गंगाबाईचा वाढदिवस होता. या घटनेनंतर त्यांना जणू नवजीवन मिळाले. कुटुंबीयांकडून साधेपणाने वाढदिवस साजरा करण्यात आला व तो संस्मरणीय ठरला. काही महिन्यांपूर्वीपर्यंत तांदूळ निवडण्याइतकी दृष्टी चांगली असलेल्या गंगाबाईंची ही घटना सध्या चर्चेचा विषय आहे.

# स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान १३ फेब्रुवारीपर्यंत

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान 30 जानेवारी ते 13 फेब्रुवारी 2026 या कालावधीत राबविण्यात येणार आहे. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या पुण्यतिथीनिमित्त राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर कुष्ठरोग निवारण दिन साजरा करण्याबाबत केंद्र शासनाने निर्देश जारी केले आहेत. या अनुषंगाने स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियान जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. या पंधरवड्यात विविध आरोग्य साक्षरतेचे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.



स्पर्श कुष्ठरोग जनजागृती अभियानाच्या अनुषंगाने आज जिल्हाधिकारी कार्यालयात अपर जिल्हाधिकारी प्रवीण महिरे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सहायक संचालक कुष्ठरोग डॉ. विजय डोइफोडे यांच्यासह संबंधित आरोग्य यंत्रणेचे अधिकारी उपस्थित होते.

जनजागृती अभियानांतर्गत पंधरवड्यात शाळेमध्ये प्रार्थनेनंतर कुष्ठरोग प्रतिज्ञाचे वाचन, नाटक प्रश्नमंजुषा स्पर्धा निबंध स्पर्धा कुष्ठरोगावरील गाणी कविता वाचन रांगोळी स्पर्धा पथनाट्य कुष्ठरोगावरील मनी घोषवाक्य आदी स्पर्धांचे कार्यक्रम राबविण्यात येणार आहेत. शालेय विद्यार्थ्यांची प्रभात फेरी तसेच कुष्ठरोग दोड मॅरेथॉनचे आयोजन करण्यात येणार आहे. यासोबतच या अनुषंगाने अनेक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

26 जानेवारी 2026 रोजी ध्वजारोहणानंतर जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील सर्व प्रा.आ. केंद्रे, ग्रामीण/उपजिल्हा रुग्णालये सामान्य रुग्णालये, नगरपालिका दवाखाने, महानगरपालिका दवाखाने, शासकीय/निमशासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये, आश्रमशाळा, अंगणवाडी येथे कुष्ठरोग निर्मुलनाची प्रतिज्ञा घेण्यात येणार आहे.

## आजपासून मिठा निम उर्स

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :

दरवर्षीप्रमाणेच यंदाही बाबा मिठा नीम औलिया रहमतउल्लाह अलैह यांचा 215 व्या उर्सला 15 जानेवारीपासून सुरूवात होत असून हा उर्स 19 जानेवारीपर्यंत राहणार आहे. 16 जानेवारीला शरीफ आणि शबेमेराज, दुपारी 3 वाजता श्रीमंत राजे मुधोजी भोसले यांच्या हस्ते चादर चढविण्यात येईल. सायंकाळी 6 वाजता मिठा निम येथून संदल काढण्यात येईल. उर्स दरम्यान दररोज सकाळी कुराण पाठ व नमाज होईल. रात्री 9.30 ला कव्वालीचा कार्यक्रम होईल. 19 ला सकाळी 11.30 वाजता लंगरचा कार्यक्रम होईल. बाबा सय्यद जलालुद्दीन औलिया हे भोसला राजेच्या अरब रेजीमेंटमध्ये सेनापती होते. सीताबर्डी युद्धाच्या वेळी बाबांची आत्मिय शक्ती प्रकट झाली. बाबा औलिया हे नेहमीच निंबाच्या झाडाखाली प्रार्थनेसाठी रहायचे. त्याच निंबाच्या झाडाखाली बाबांचा दर्गा शरीफ आहे. बाबाच्या आठवणीने निंबाच्या पाने देखील गोड झाली होती. तेव्हापासून या स्थळाला मिठा निम असे नाव पडले.

## सहा महिन्यांच्या श्वानाला हृदयविकाराचा झटका
# सीपीआरमुळे जीव वाचला

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

नागपुरातील भांडेवाडी परिसरात एका श्वानाचे पिल्लू चालता चालता अचानक हृदयविकाराचा झटका आल्याने जमिनीवर कोसळले.त्याचे श्वास घेणेही थांबले होते. दरम्यान येथील प्राण्याची देखभाल करणाऱ्या एबीसी केंद्राचे इंचार्ज सचिन देऊळकर तेथेच होते. त्यांनी झटपट पिल्लाच्या छातीवर दाब देत सीपीआर देणे सुरू केले. सुमारे पाच मिनटे ही प्रक्रिया सुरू होती.

नागपुरातील भांडेवाडी परिसरातील स्मॉल फॅक्टरी परिसरात इलेक्ट्रिक बस डेपो आहे. या डेपोमध्ये वास्तव्यास असलेल्या सहा महिन्यांच्या मादी श्वानाचे नाव छोटी आहे. ज्येष्ठ पशुसेविका करिश्मा गलानी या नियमितपणे श्वानांची देखभाल करतात. मंगळवारी श्वानांवरील नसबंदीसाठी सचिन देऊलकर भांडेवाडीतील डेपोमध्ये आले होते.

यावेळी करिश्मा गलानी यांनी नाव घेताच छोटी (श्वान) आनंदाने धावत आली; मात्र काही क्षणांतच तिला अचानक हृदयविकाराचा झटका आला. त्यामुळे छोटी जमिनीवर कोसळ्ली. तिने श्वास घेणेही थांबवल्याने तिचा मृत्यू झाल्याचा अंदाज उपस्थितांनी वर्तवला. हे ऐकताच करिश्मा गलानी भावुक झाल्या आणि देऊळकर यांना सर, काहीतरी करा, अशी विनंती क्षणाचाही विलंब न करता देऊलकर यांनी श्वानाची जीभ बाहेर काढून योग्य पद्धतीने सीपीआर देण्यास सुरुवात केली. सुमारे पाच मिनिटांच्या प्रयत्नांनंतर छोटीने पुन्हा श्वास घ्यायला सुरुवात केली आणि तिचा जीव वाचला. हा संपूर्ण प्रसंग पाहण्यासाठी डेपोतील कर्मचारी व नागरिकांची गर्दी झाली होती. या घटनेमुळे हृदयविकाराचा झटका हा केवळ माणसांपुरता मर्यादित नसून लहान वयाच्या श्वानांनाही होऊ शकतो, हे पुन्हा अधोरेखित झाले आहे. बदलती जीवनशैली, पर्यावरणीय घटकाचा परिणाम श्वानांच्या आरोग्यावर होत असल्याचे या घटनेमुळे पुढे आले आहे.

सध्या छोटी धक्क्यात असून तिची प्रकृती स्थिर आहे. तिच्या आरोग्याची काळजी घेत नसबंदी प्रक्रिया तात्पुरती स्थगित करण्याचा निर्णय देऊलकर यांनी घेतला आहे. योग्य वेळी घेतलेला निर्णय आणि प्रशिक्षणामुळे एका निष्पाप जीवाला नवसंजीवनी मिळाल्याने सर्वत्र कौतुक होत आहे. दरम्यान नागपुरात मोठ्या प्रमाणावर श्वान फिरत असतात. त्यापैकी अनेकांचे अचानक निधन होते. त्यांनाही सीपीआर देऊन वाचवणे शक्य असल्याचे या घटनेवरून पुढे आल्याचे प्राणी प्रेमिंचे म्हणने आहे.





■ नागपूर : मकर संक्रांतीचा सण भाषा आणि प्रांतवार वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. दाक्षिणात्य राज्यांमध्ये पोंगल आणि विलाकू या नावाने हा सण साजरा होतो. नागपूर शहरातील दक्षिण भारतीय लोकांनी भव्य मिरवणूक काढत हा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला.

## निवडणुकीच्या दिवशी शहर बस सेवेसंबंधी महत्त्वाची सूचना



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १४ :

नागपूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ करिता गुरुवार १५ जानेवारी रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजित चौधरी यांच्या निर्देशानुसार, मनपाच्या परिवहन विभागातर्फे नागरिकांच्या सोयीसाठी आणि वाहतुकीचे सुरळीत नियोजन करण्यासाठी शहर बस सेवेच्या वेळापत्रकात बदल करण्यात आला आहे.

मनपा शहर परिवहन विभागामार्फत १५ जानेवारी सकाळी ६:०० ते दुपारी १:०० वाजेपर्यंत सर्व मुख्य मार्गांवर आणि इनर रिंग रोडवर विशेष २५० बसेस धावतील. या कालावधीत विविध ठिकाणांहून येणाऱ्या बसेस फक्त शहराच्या 'ऑक्ट्रॉय' (नाका) हद्दीपर्यंत चालवल्या जातील. तर दुपारी १:०० ते रात्री १०:०० वाजेपर्यंत बस सेवा मर्यादित स्वरूपात असेल. शहरातील प्रमुख मार्गांवर केवळ ५० बसेस कार्यान्वित राहतील.

प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी सर्व बसेसवर सुधारित मार्ग आणि गंतव्यस्थानांचे फलक स्पष्टपणे लावले जातील. नागरिकांनी या बदललेल्या वेळापत्रकाची नोंद घेऊन सहकार्य करावे, असे आवाहन मनपा प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

## नागपूर जिल्हा सिकलसेल मुक्त करण्यासाठी
# अरुणोदय विशेष मोहीम

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

सिकलसेल सारख्या अनुवांशिक आजारातून भावी पिढीला मुक्त करण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषद अंतर्गत अरुणोदय सिकलसेल ॲनिमिया मुक्त विशेष अभियान राबविण्यात येणार आहे. १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत चालणाऱ्या या मोहिमेद्वारे जिल्ह्यातील ० ते ४० वयोगटातील नागरिकांची व्यापक आरोग्य तपासणी आणि जनजागृती केली जाणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागातर्फे देण्यात आली आहे.

लोकचळवळीच्या माध्यमातून राबविण्याचे नियोजन केले आहे. या विशेष अभियानात संशयित रुग्णांची प्राथमिक तपासणी, 'HPLC' चाचणी, मोफत औषधोपचार आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे विवाहपूर्व व प्रसूतीपूर्व समुपदेशनावर विशेष भर दिला जाणार आहे.

सिकलसेल कुंडलीः भविष्यातील पिढी सुरक्षित राहण्यासाठी लग्नापूर्वी तरुण-तरुणींनी सिकलसेल चाचणी करून आपली 'सिकलसेल कुंडली' जुळवणे आवश्यक आहे, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

जनजागृतीसाठी त्या-त्या भागात गोंडी व इतर स्थानिक बोलीभाषेतील संदेश, ऑडिओ क्लिप्स आणि बॅनरचा वापर केला जाणार आहे. शाळा, महाविद्यालये आणि आश्रमशाळांमध्ये प्रभातफेरी, प्रश्नमंजुषा, रांगोळी व निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात येत असून ग्रामपंचायत स्तरावर दवंडीद्वारे माहिती पोहोचवली जाणार आहे.

मोहिमेच्या काळात येणारे स्थानिक सण, यात्रा आणि धार्मिक उत्सवांमध्ये विशेष स्क्रीनिंग स्टॉल्स लावून नागरिकांची जागेवरच तपासणी केली जाईल. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.राजकुमार गहलोत, तालुका आरोग्य अधिकारी आणि प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली आशा स्वयंसेविका, ए.एन.एम. आणि स्वयंसेवक घरोघरी संदेश पोहोचवणार आहेत. या मोहिमेत लोकप्रतिनिधी, धर्मगुरू, सामाजिक कार्यकर्ते आणि प्रसारमाध्यमांचा सक्रिय सहभाग घेतला जाणार आहे.

नागपूर जिल्ह्यातील सर्व वय 40 पर्यंतच्या सर्व नागरिकांनी, विशेषतः तरुण वर्गाने आपली सिकलसेल चाचणी करून घ्यावी आणि या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा.

## काँक्रीट मिक्सरच्या धडकेत तरुणाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १४ :

रस्ता ओलांडत असलेल्या तरुणाला भरधाव असलेल्या काँक्रीट मिक्सर ट्रकच्या चालकाने जबर धडक दिली आणि पळून गेला. ही घटना बजाजनगर पोलिस ठाण्यांतर्गत माटे चौकाजवळ घडली. गंभीर जखमी तरुणाचा रुग्णालयात मृत्यू झाला. सुरेंद्र रामदास परतेकी (२९) रा. जयताळा असे मृताचे नाव आहे. या प्रकरणी पोलिसांनी करण चिकाटे (रा. त्रिमूर्तीनगर)च्या तक्रारीवरून अज्ञात ट्रकच्या चालकाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, माटे चौकाजवळील इन्फोटेक टॉवरच्या शेजारी करणचे चायनीज सेंटर आहे. सुरेंद्र त्याच्या चायनीज सेंटरमध्ये करीत होता. सुरेंद्र नैसर्गिक विधीसाठी रस्ता ओलांडून दुसऱ्या बाजूला गेला होता. परत दुकानाकडे जात असताना सुभाषनगरच्या माटे चौकाकडे जात असलेल्या काँक्रीट मिक्सर ट्रकच्या चालकाने वाहन निष्काळजीपणे चालवून सुरेंद्रला जबर धडक दिली.

## भाजप-कॉंग्रेसच्या नगरसेवकांसह नगरसेविकेच्या पती विरोधात गुन्हे दाखल

■ महासागर प्रतिनिधी
कळमेश्वर, दि. १४ :

कळमेश्वर तहसील कार्यालय परिसरात तीन वर्षाआधी १७ आरोपींनी संगनमत करुन फिर्यादिला जातीवाचक शिविगाळ करीत त्यांचे राहते घर जेसीपीने पाडून त्यांचे कूटूंबाचे हाल केल्याच्या घटने प्रकरणी नुकताच कळमेश्वर पोलीसांनी अनुसूचीत जाती जमाती (ॲक्ट्रासीटी ॲक्ट) अंतर्गत गुन्हा दाखल झाल्याने राजकीय क्षेत्रात एकच खळबळ उडाली. आरोपींमध्ये नुकत्याच झालेल्या नगर पालीकेच्या निवडणूकतीत निवडून आलेले भाजपचे शहराचे बाहूबल्य नेते तथा नगरसेवक तसेच कॉंग्रेसच्या एका नगरसेवकासह नगरसेवीकेचा पती असल्याने शहरातील राजकीय वातावरन खळबळजनक आश्चर्याचे झाले आहे.

फिर्यादी भिमराव राधोबाजी निकोसे वय 56 ह्यांचे कळमेश्वर तहसिल कार्यालय परिसरात च्याळीस वषापुर्वीचे विक्रीपत्रनूसुार हक्काचे १०८० स्के .फूटमध्ये राहते घर होते.आरोपींनी संगनमत करुन एकत्रीत येत दि. 27/10/2022 रोजी सकाळी ११ वाजताचे दरम्यान जेसीपी आणून चक्क फीर्यादीला जातीवाचक शिवीगाळ करीत लाठ्या काठ्या दाखवीत जीवे मारण्याची धमकी देत हाकलून लावीत घर पाडणे सुरु केले. यात त्यांचे कूटूंब उघड्यावर आले.

या प्रकरणी दि. १० जानेवारी रोजी कळमेश्वर पोलीसांत फिर्यादिने लेखी तक्रार दिल्याने पोलीसांनी अनूसुचीत जाती जमाती ॲक्ट अंतर्गत आरोपी नरेंद्र अशोक भुसारी, धनराज गुलाबराव देवके, विलास श्रीधर मानकर, अरविंद अशोक भुसारी, शालीक श्रावण तरारे, गुणवंता परसराम पांडे, निलेश श्रावण होले,दिनेश श्रावण होले, अब्बास महेबुबाह शेख, गजानन काशीनाथ काळबांडे, अशोक मोहन भोमरे, रविंद्र अजाबराव तरारे, सचीन शेषराव चर्जन, दिवाकर केशव अडकने, शेषराव बापुराव चर्जन, बाळकुष्ण मोहन गमरे, गिरीधर होले, संजय विठोबाजी धोंगडी ह्यांच्याविरोधात विविध कलमा अंतर्गत गुन्ह्याची नोंद करीत तपासाची वेगाने चक्रे फिरवीली आहे.

## नागपूर ते नागभीड रेल्वे सुरू होण्याकरीता दोन वर्षाची प्रतिक्षा
# मरू नदीवरील मोठ्या पुलाचे काम पूर्ण

■ राजेश जांभुळे
भिवापूर, दि. १४ :

नागपूर - नागभीड हा नॅरोगेजचे रूपांतर हे ब्रॉडगेज परिवर्तन प्रकल्पात होत असून २२०० कोटी रुपये खर्च करून महारेलच्या वतीने हा प्रकल्प तयार करण्यात येत आहे. नागपूर ते उमरेड पर्यंत रेल्वेच्या मागार्चे काम पुर्ण झाले असून कारगाव जवळ वाहतूक पुल व लगतच क-हाडला अभयारण्य असल्याने वन्यप्राण्याला खालून ये जा करण्याचा मार्ग नवेगाव देशमुख पर्यत करण्यात येणार आहे.

सदरचे हे काम संथगतीने सुरू असल्याने नागपूर -नागभीड ब्रॉडगेज रेल्वे लाईन सुरू होण्यासाठी दोन वषार्चा कालावधी लागण्याची शक्यता दिसून येत आहे.



हे अंतर १०६ किमी चे राहणार असून या मार्गावर ११ प्रवासी स्टेशन राहणार आहे. हा नागपूर ते नागभीड हा रेल्वे प्रकल्प कोळसा वाहतूक करीता गेमचेंजर ठरणार आहे.

कोळसा वाहतूक करीता लागणारी वेळ चोवीस तासा वरून कमी होवून चार -पाच तासापर्यंत येणार आहे.कारगाव पासून भिवापूर पर्यंत रेल्वेची पटरी टाकणे बाकी आहे. इतवारी ते नागभीड ब्राडगेज परिवर्तन प्रकल्प पूर्ण होण्यासाठी आणखी दोन वषार्चा कालवधी लागण्याची शक्यता आहे. उमरेड कोलमाइन्स मधून निघणारा कोळसा बुट्टेबोरी तसेच खापरखेडा , कोराडी, महाजनको, अडाणी पॉवर प्लांट येथे पाठविला जाणार असल्याची माहिती सुत्राकडून प्राप्त झाली आहे. तसेच उमरेड ते भिवापूर पर्यंत रेल्वे पटरी टाकण्याच बरच काम झाले आहे.

भिवापूर येथील रेल्वे स्टेशनचे पुर्ण झाले असून इलेक्ट्रीक काम होणे बाकी आहे.येथील प्लाटफार्मवर तीन रेल्वे पटरी व्यवस्था राहणार असून या मार्गावरील काही जागी वनविभागाच्या अडचणीमुळे कारगाव जवळ पुलाचे काम रखडले होते. तसेच याच मार्गा जवळील कारगाव येथून नवेगाव देशमुख वनविभागाच्या विश्रामगृह जवळ वन्य प्राण्याला ये -जा करण्याच्या मार्ग व्यवस्था महारेल कडून करण्यात येत असून सदरचे काम संथगतीने सुरू आहे. सहा वषार्पूर्वी इंग्रज कालीन नॉरो गेजवर लाईनवर शंकुतला गाडी धावत होती. आता दोन वषार्नंतर ब्रॉडगेज लाईनवर रेल्वे धावतांना दिसणार आहे.

## १० नंबर पूल परिसरातील नाल्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात

महासागर
प्रभाग वार्ता

■ प्रमोद जांभूळकर, नागपूर, दि. १४ :

प्रभाग क्रमांक ९ इंदोरा येथील १० नंबर पूल परिसरातून वाहणाऱ्या नाल्यात मोठ्या प्रमाणात घाण साचली असून परिसरात तीव्र दुर्गंधी पसरली आहे. नाल्यातील कचरा, साचलेले पाणी यामुळे माशा व डासांचा प्रचंड प्रादुर्भाव वाढला असून नाल्याच्या काठावर राहणाऱ्या वस्तीतील नागरिकांना गंभीर त्रास सहन करावा लागत आहे. या नाल्यालगतच नागसेन विद्यालय आणि आदर्श कन्या विद्यालय असल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.



शाळेच्या प्रांगणात विद्यार्थी खेळत असताना दुर्गंधीचा तीव्र त्रास होत असून संसर्गजन्य आजार पसरण्याची भीती नागरिकांकडून व्यक्त करण्यात येत आहे.परिसरातील नागरिकांनी नाल्याची तात्काळ साफसफाई करावी तसेच भविष्यातील धोके टाळण्यासाठी नाल्याची सुरक्षा भिंत उंच करून बांधण्यात यावी, अशी ठाम मागणी केली आहे. या संदर्भात राजेश राऊत, हेमराज जांभूळकर, शैलेंद्र मेश्राम, प्रभू गजभिये, प्रशांत मेश्राम, मनोज गजभिये, शैलेश बेहेरे, अजय सहारे, प्रशांत साखरे व राजेश जांभूळकर यांनी महापालिका प्रशासनाकडे लक्ष वेधले आहे.

नागरिकांचे आरोग्य, विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि परिसरातील स्वच्छतेच्या दृष्टीने महापालिकेने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी होत आहे.